# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय: स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे 401101.

दिनांक:-२५ /०३ /2022

जा.क्र.मनपा/आस्था/ ३७२७ /2021-22

**आदेश**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उप अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील खालील अधिकारी यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर जा.क्र.मनपा/आस्था/363/2021-22, दि.11/03/2022 रोजीच्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर अधिकाऱ्यांची खालीलप्रमाणे दर्शविल्यानुसार पदस्थापना करणेत येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | सद्या कार्यरत विभागाचे नाव | पदोन्नतीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| 1) | श्री.किरण राठोड,<br>कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | पाणीपुरवठा विभाग | मल:निसारण विभाग |
| 2) | श्री.शरद नानेगांवकर,<br>कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | पाणीपुरवठा विभाग | • घनकचरा प्रकल्प<br>• प्रभाग समिती क्र.04 व 06<br>( सर्व स्थापत्य विषयक कामे) |

संबंधित अधिकाऱ्यांनी कमीत कमी पदग्रहण अवधी घेऊन नव्या पदाचा पदभार स्विकारावा व आपला पदग्रहण अहवाल आस्थापना विभागात विनाविलंब सादर करावा. सदर कर्मचारी पदोन्नतीने पदस्थापनेच्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून 07 दिवसांच्या विहीत मुदतीत रुजु न झाल्यास त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल. तसेच, त्यांचे लक्ष महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम, 1979 मधील नियम-23 कडे वेधण्यात येत आहे. सदर नियमातील तरतूदी लक्षात घेता, त्यांनी पदस्थापनेत बदल करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील.

उपरोक्त नमुद अधिकाऱ्यांनी पदस्थापनेच्या पदावर हजर न झाल्यास अथवा पदोन्नती न स्विकारल्यास पदोन्नती आपोआप रद्द होईल. तसेच सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.:- एसआरव्ही-1087/1131/प्र.क्र.11-89/बारा, दि.30 एप्रिल, 1991 मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

संबंधित विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, सदर अधिकाऱ्यांनी पदभार स्विकारल्याचा दिनांक त्वरित आस्थापना विभागास कळवावा. विहित कालावधीत ते रुजु न झाल्यास त्याबाबत आस्थापना विभागात अवगत करण्यात यावे, जेणेकरुन संबंधिताविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई त्वरीत करणे शक्य होईल. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 मधील नियम 30(सी) नुसार त्यांचा रजा अर्ज स्वीकारु नये/मंजुर करु नये.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**
संबंधित अधिकारी

**प्रत:- माहितीस्तव,**

1) मा.महापौर, मा.उप-महापौर, मा.सभापती (स्थायी समिती), मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता
2) अतिरिक्त आयुक्त (1) व (2), उपायुक्त (सर्व), संगणक विभाग (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी), आस्थापना निवडनस्ती